भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २५.०७.२०२० ते २९.०७.२०२०)

| अंक ५८/२०२० | दिनांक २४.०७.२०२० | अंक ५५/२०२० |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१७/०७/२०२० ते २३/०७/२०२० पर्यंत) | | | | | | | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २५/०७/२०२० ते २९/०७/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/०७ | १८/०७ | १९/०७ | २०/०७ | २१/०७ | २२/०७ | २३/०७ | दिनांक | २५/०७ | २६/०७ | २७/०७ | २८/०७ | २९/०७ |
| ४५.५ | १२५.६ | ६६.८ | ३४.२ | १.२ | १.२ | ०.० | पाऊस (मि. मी) | ६७ | ६५ | ४२ | ४२ | २४ |
| २७.० | २७.० | २९.० | ३१.० | ३१.० | ३१.० | ३१.५ | कमाल तापमान (अं. से) | ३३ | ३३ | ३३ | ३१ | ३० |
| २३.० | २३.० | २३.० | २३.० | २४.० | २४.० | २४.५ | किमान तापमान (अं. से) | २४ | २४ | २४ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ८ | ८ | ५ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | |
| ९८ | ९८ | ९५ | ९६ | ९७ | ९३ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९१ | ८७ | ९२ | ९१ | ९१ |
| ९८ | ९० | ९५ | ७८ | ७८ | ७२ | ७२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६७ | ६६ | ७३ | ८० | ७२ |
| ०.१ | ०.३ | ०.२ | ०.२ | ०.२ | ०.९ | ०.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००३ | ००८ | ००७ | ००७ | ००३ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ वा-याची दिशा | पूर्वोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर / आग्नेय कडे | दक्षिणोत्तर / नैऋत्ये कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे |
| पुर्वोत्तर ईशान्य | पुर्वोत्तर ईशान्य | स्थिर | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | स्थिर | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | २४२०.० | २४१६.८ | २७४.५ |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती: | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये दिनांक २५ व २६ जूलै रोजी बहूतांश ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या तर दिनांक २७, २८ व २९ जूलै रोजी बहूतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे त्याचबरोबर तापमानामध्ये काहि अंशी वाढ होऊन हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे.<br>इशारा: सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक २५, २६ व २७ जूलै, २०२० रोजी तूरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |

### हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | फुटवे | गेल्या आठवड्यात पाऊसाची तिव्रता कमी असल्यामूळे पुर्नलागवड केलेल्या भात पिकाला पाणी कमी पडत असल्यास बाहेरुन (नदी, नाले, विहिरि, तळी ई.) आवश्यकतेनूसार पाण्याचा पुरवठा करावा. भात खाचरात पाणी साठवणूकीकरीता बांधबंदीस्ती करावी.<br>या आठवडयात हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी भाताच्या पुर्नलागवडीनंतर एक महिना झालेले पीक फुटवे येण्याच्या अवस्थेत असल्याने नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति गुंठा 870 ग्रॅम युरीयाच्या स्वरुपात दयावा. तत्पूर्वी भात खाचरातील तणांची बेणणी करावी व शेतातील पाणी काढून टाकावे. खत दिल्यानंतर पाणी बांधून घ्यावे. तसेच भात पीकाचे कीड, रोग इ. साठी सतत निरक्षण करावे. शेतातील पाण्याची पातळी 5 से.मी. पर्यंत ठेवावी. त्यासाठी शेताची बांधबंदिस्ती करावी तसेच बांधावरील तणांची साफसफाई करावी. जास्त पाउस झाल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>विदयापीठाच्या शिफारसीप्रमाणे युरिया-डी.ए.पी. ब्रिकेट्सचा वापर करावा. ज्या ठिकाणी भाताची लावणी पूर्ण होउन जास्त दिवस झालेले आहेत अशा ठिकाणी पाण्याची पातळी योग्य राहिल याची दक्षता घ्यावी.<br>भातावर करपा रोगाचा प्रादूर्भाव आढळून आल्यास आवश्यकतेनूसार कार्बेडॅझिम 10 ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड 25 ग्रॅम प्रती 10 ली पाण्यातून फवारावे. |
| नागली | पुर्नलागवड ते रोप अवस्था | गेल्या आठवड्यात पाऊसाची तिव्रता कमी असल्यामूळे पुर्नलागवड केलेल्या नागली पिकाला पाणी कमी पडत असल्यास बाहेरुन (नदी, नाले, विहिरि, तळी ई.) आवश्यकतेनूसार पाण्याचा पुरवठा करावा. नागली खाचरात पाणी साठवणूकीकरीता बांधबंदीस्ती करावी.<br>ज्या ठिकाणी नागली पुर्नलागवडीची कामे पाठीमागे राहिली असल्यास या महिना अखेरपर्यंत ती पुर्ण करुन घ्यावीत. |
| भूईमुग | पेरणी | भूईमुगाच्या लागवडीमध्ये पाण्याचा योग्य निचरा करावा व पेरणीनंतर २० दिवसांनी बेणणी करावी. |
| आंबा | नवीन पालवी | आंबा पिकात खताची मात्रा देउन झालेली असल्यास, नियमीत फळधारणेसाठी कलमांना 15 जूलै ते 31 ऑगस्ट या दरम्यान 10 वर्षावरील कलमांना पॅक्लोब्युट्रॉझॉल दयावे. पॅक्लोब्युट्रॉझॉल हे झाडाच्या आकारमानानूसार व पसारा मोजून दयावयाचे असल्याने झाडाचा पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर पसा-याचा व्यास मोजावा. उदा. पुर्व-पश्चिम व्यास 5 मीटर व दक्षिण-उत्तर व्यास 3 मीटर म्हणजे सरासरी व्यास 4 मीटर होईल. ते 23 टक्के पॅक्लोब्युट्रॉझॉल घटक असलेल्या रसायनातून दयावयाचे असल्याने प्रती मिटर व्यासास 3 मिली प्रमाणे 12 मिली कल्टार दयावे. या आठवडयात पावसाचे प्रमाण कमी असल्यामूळे प्रत्येक झाडाला पॅक्लोब्युट्रॉझॉल मात्रा घेउन 3 ते 6 लीटर पाण्यात मिश्रण तयार करावे व खताच्या रिंगेच्या आतल्या बाजुस 15 सेमी खोलीचे 25 ते 30 खड्डे खणावे प्रत्येक खड्डयात 100 मिली याप्रमाणात पॅक्लोब्युट्रॉझॉल ओतावे आणि खड्डे बुजवून घ्यावेत. पॅक्लोब्युट्रॉझॉल देण्यापुर्वी व नंतर झाडाभोवती असलेले गवत काढून घ्यावे. तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी व पावसाची उघडीप बघून पॅक्लोब्युट्रॉझॉल दयावे.<br>मागील पंधरवडयात पावसाच्या उघडीपमूळे आंबा झाडांना नवीन पालवी आली असून त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून अवश्यकतेनूसार संरक्षण करावे. त्यासाठी 25 टक्के प्रवाही डायमिथोएट 12 मिली किंवा 36 टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस 11 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा |
| काजु | - | नविन लागवड केलेल्या काजू कलमांना बांबूच्या काठीचा आधार दयावा तसेच कलमांचे बुंधे तणविरहीत व स्वच्छ ठेवावेत.<br>काजूवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादूर्भाव आढळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादूर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजूमध्ये काढणीनंतर जून्या व रोगट फांदया कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| भाजीपाला | शाखिय वाढ | भाजीपाला क्षेत्रामध्ये उगवलेल्या तणांची बेणणी करावी. पावसाचा अंदाज बघून प्रती गुंठा क्षेत्रास 720 ते 870 ग्रॅम युरीयाचा एक तृतीयांश हप्ता बांगडी पदधतीने दयावा. |
| दूभती जनावरे व शेळया | पशुवैदयकांच्या मार्गदर्शनाखाली गायी आणि बैलांना फ-या रोग आणि गायी आणि म्हैशींना घटसर्प रोगप्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. लसीकरणानंतर उत्तम रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होण्यासाठी जनावरांना चांगला व सकस आहार दयावा. | |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |